| शिक्षण संचालनालय<br>(माध्यमिक व उच्च माध्यमिक)<br>महाराष्ट्र राज्य<br>मध्यवर्ती इमारत, डॉ.ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१ | सत्यमेव जयते<br>महाराष्ट्र शासन | Government of Maharashtra<br>**DIRECTORATE OF EDUCATION**<br>**(Secondary & Higher Secondary)**<br>**Maharashtra State**<br>Central Building, Dr.Annie Besant Road, Pune-1 |
|---|---|---|

w'site : education.maharashtra.gov.in Phone : (020) 2612 0361 e-mail : doehighersec@gmail.com


**परिपत्रक**

**क्र.विद्या-ए-1/11.प्रवेश/2020/**
**दिनांक-03/09/2020**

**प्रति,**
**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
**मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर**

**विषय- इ.11वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन.2020-21**
**नियमित फेरी-2 साठीचे वेळापत्रक व प्रवेशाचे कार्यवाहीबाबत-**
**संदर्भ-** संचालनालयाचे पत्र क्र.विद्या-ए-1/11.प्रवेश/2020/ दि.10/08/2020.

राज्यातील मुंबई महानगर क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिचवड, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर महानगरपालिका क्षेत्रांतील इ.11वी प्रवेशांसाठी केंद्रिय ऑनलाईन प्रवेश राबविणेत येत आहे. त्याबाबत शून्य फेरी व नियमित फेरी-1 साठीचे वेळापत्रक संदर्भिय पत्रान्वये जाहीर करण्यात आलेले होते. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे. तथापि प्रवेश प्रक्रियेबाबत खालील बाबीचं स्पष्टीकरण देण्यात येत आहे. त्यानुसार कार्यवाही करणेत यावी.

1. कोवीड-19 मुळे उद्भवलेल्या परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांना मिळालेल्या उच्च माध्यमिक विद्यालयात प्रवेश निश्चित करणेसाठी विलंब लागत आहे. तसेच अद्याप निश्चित झालेल्या प्रवेशाचे प्रमाण कमी दिसून येत आहे. त्यानुसार विद्यार्थी, पालक व उच्च माध्यमिक विद्यालये यांनी प्रवेशासाठी मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे. सबब नियमित फेरी-1 मध्ये अलॉट झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चित करणेसाठी एक दिवस वाढीव वेळ देण्यात येत आहे. तरी **नियमित फेरी-1 मधील प्रवेश दि.04/09/2020 रोजी सायं. 05:00वा पर्यंत पूर्ण करावे.**
2. **Proceed for Admission-** प्रवेश फेरीमध्ये Allitment नंतर विद्यार्थ्यांस प्रवेशासाठी मिळालेल्या उच्च माध्यमिक विद्यालयात प्रवेश घ्यावयाचा असल्यास आपलया लॉगीनमध्ये त्याने Proceed for Admission क्लिक करणे आवश्यक आहे. त्यानंतर संबंधित उच्च माध्यमिक विद्यालयाशी संपर्क साधून आपला प्रवेश निश्चित करुन घ्यावा व Admission Letter प्रिंट काढून ठेवावे. केवळ Proceed केले म्हणजे प्रवेश झाला असे होत नाही हे लक्षात घ्यावे. चुकीने Proceed for Admission केले असल्यास Undo Proceed करण्याची सुविधा विद्यार्थी लॉगीन मध्ये देण्यात आलेली आहे.
3. **Withdrawal of Application-** ज्या विद्यार्थ्यांना इ.11वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतून बाहेर जायचे असेल अथवा ज्या विद्यार्थ्यांना इतर अभ्यासक्रमांना प्रवेश घ्यावयाचा असेल त्यांनी अपला अर्ज मागे घेण्यासाठी या सुविधेचा वापर करावा. Withdrawal of Application केल्यानंतर सदर विद्यार्थ्यांचा अर्ज सिस्टम मधून रद्द (Deregister/Decactivate) होईल. सर्व सूचना काळजीपूर्वक वाचा व पुढे जा. जर एखाद्या विद्यार्थ्याने चुकीने Withdraw Application बटन क्लिक केले असेल तर असे अर्ज पुन्हा UnWithdraw करण्याची सुविधा शिक्षण उपसंचालक लॉगीन मध्ये देण्यात आलेली आहे.
4. **नियमित फेरी-2 साठीचे वेळापत्रक सोबत संलग्न आहे.**

**(दिनकर पाटील)**
**शिक्षण संचालक**
माध्यमिक व उच्च माध्यमिक

Directorate of Education (Secondary and Higher Secondary) MS, Pune

**Std.11th Centralised Online Admission Process 2020-21**

## Admission Process Schedule

(Mumbai MMR, Pune & Pimpri-Chinchwad, Nashik, Aurangabad, Amravati, Nagpur Municipal Corporation Regions)

https://11thadmission.org.in

| Sr | Date & Time | Process Details | |
|---|---|---|---|
| | | **Regular Admission Round – II** | |
| 1 | 04-09-2020,<br>10:00 PM | Display of vacancy list for Regular Admission round-II<br>(including Quota seats surrendered by Jr. Colleges) | |
| 2 | 05-09-2020,<br>00:05AM<br>To<br>07-09-2020<br>06:00PM | **1) Choice filling in Option Form (i.e.Part-2) for Regular Round-II will start**<br>2) Update Preferences given in Option form (Part-2)<br>3) New student can also submit their Part-1 & 2 during this period.<br>4) Form verification & Edit by Guidance centre / secondary schools.<br>5) Application for Management or Minority Quota can be sent to Jr. Colleges.<br>6) Part-1, Verification & Part-2 Filling will be closed. | |
| 3 | 08-09-2020<br>To<br>09-09-2020 | **Time reserved for DATA PROCESSING**<br>Preparation of Merit list of eligible Candidates.<br>Audit of allocation by divisional CAP committees. | |
| 3 | 10-09-2020,<br>10:00 AM | **1) Display of Jr. College Allotment List for Regular Round-II Admissions.**<br>2) Display of allotted Jr. College for admission in student's login.<br>3) Display of allotted students list in concerned college login.<br>4) Display of cut-off list for Regular Admission Round-2.<br>5) SMS to students. | |
| 4 | 10-09-2020,<br>11:00 AM<br>To<br>12-09-2020,<br>05:00 PM | 1) Students to click (Proceed For Admission) if ok with allotted Jr. College<br>**2) Confirmation of admission in the allotted Jr. College by Student.**<br>3) Admission Confirmation, Rejection & Admission cancellation at Jr. Clg. Login.<br>4) Quota Admission process also continue. (Management & Minority)<br>5) Management Quota seats can be Surrendered.<br>6) **Registration & Part-1 filling will start. (New applicants for next round).**<br>**Notes: -**<br>• Students who have been allotted to **first preference**, it is compulsory to take admission in the allotted Jr. College.<br>• If such students failed to take admission or Rejected, they will be blocked for further Regular Rounds and will be considered during Special Round only.<br>• If a student wish to cancel his/her confirmed admission, can request concerned Jr. College for this and get the admission cancelled.<br>• Such students **who have cancelled their admissions** will be restricted for further Regular rounds and will have to wait till Special round. | |
| 5 | 12-09-2020,<br>08:00 PM | Time for Jr. Colleges to upload status of admitted students on the website.<br>(05:00 PM To 08:00 PM) | |
| 6 | 12-09-2020,<br>10:00 PM | Display of vacancy list for third regular admission round.<br>(including Quota seats surrendered by Jr. colleges) | |

**Instructions:**

1. All students who have confirmed their admission in any Jr. College through Centralise Admission round or through any quota admissions. For such students admission process is completed there itself.
2. Centralise Admission Process & Quota Admissions will be conducted simultaneously as per schedule.
3. Time Table for further Admission rounds (Regular-III & Special Round) will be declared thereafter.

**Pune, Dt.03/09/2020**

**(Dinkar Patil)**
Director of Education
(Secondary & Higher Secondary)

शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
**इयत्ता-11वी केंद्रिय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया 2020-21**

## प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक

(मुंबई महानगर क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिचवड, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर महानगरपालिका क्षेत्र)

https://11thadmission.org.in

| क्र | दिनांक व वेळ | कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| | | **नियमित प्रवेश फेरी-2** |
| 1 | **04-09-2020, 22:00 वाजता** | नियमित प्रवेश फेरी-2 साठी रिक्त पदे दर्शविणे.<br>(यामध्ये रिक्त असलेल्या तसेच कोटयातून प्रत्यार्पित केलेल्या रिक्त जागांचाही समावेश असेल.) |
| 2 | **05-09-2020, 00:05 वा पासून**<br><br>**07-09-2020, 18:00 वा पर्यंत** | **1) नियमित फेरी-2 साठी विद्यार्थ्यांनी पसंतीक्रम नोंदविणे (भाग-2 भरणे) सुरु.**<br>2) यापूर्वी भरलेल्या भाग-2 मधील पसंतीक्रम बदलता येतील.<br>3) या कालावधीत नवीन विद्यार्थी प्रवेश अर्ज भाग-1 व भाग-2 भरु शकतील.<br>4) मार्गदर्शन केंद्र / माध्य.शाळा विद्यार्थी अर्ज Verify & Edit करु शकतील.<br>5) व्यवस्थापन तसेच अल्पसंख्याक कोटांतर्गत प्रवेशासाठी विद्यालयांना अर्ज मागविता येतील.<br>6) प्रवेश अर्ज भाग-1 भरणे, Verify करणे व भाग-2 भरणे बंद होईल. |
| 3 | **08-09-2020 पासून 09-09-2020** | **DATA PROCESSING साठी राखीव वेळ**<br>पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी अंतिम करणे.<br>संबंधित विभागीय प्रवेश समित्यांनी Allocation Logic नुसार परीक्षण करणे. |
| 4 | **10-09-2020, 10:00 वाजता** | **1) नियमित प्रवेश फेरी-2 अंतर्गत प्रवेशासाठी गुणवत्ता यादी प्रदर्शित करणे.**<br>2) विद्यार्थी लॉगीन मध्ये त्याला प्रवेशासाठी मिळालेले उच्च माध्यमिक विद्यालय दर्शविणे.<br>3) संबंधित उच्च माध्यमिक विद्यालयास प्रवेशासाठी मिळालेल्या विद्यार्थ्यांची यादी कॉलेज लॉगीन मध्ये दर्शविणे.<br>4) दुसऱ्या नियमित फेरीचे कट-ऑफ संकेतस्थळावर दर्शविणे.<br>5) विद्यार्थ्यांना याबाबत मोबाईल संदेश पाठविणे. |
| 4 | **10-09-2020, 11:00 वा. पासून 12-09-2020, 17:00 वा. पर्यंत** | 1) मिळालेले उमावि मध्ये प्रवेश घ्यावयाचा असल्यास विद्यार्थ्यांनि (Proceed for Admission) करणे.<br>**2) विद्यार्थ्याने मिळालेल्या उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये प्रवेश निश्चित करणे.**<br>3) उमावि ने विद्यार्थ्यांचे प्रवेश ऑनलाईन निश्चित करणे, घेतलेला प्रवेश रद्द करणे अथवा प्रवेश नाकारता येणे.<br>4) व्यवस्थापन व अल्पसंख्याक कोटा प्रवेश सुरु राहतील.<br>5) व्यवस्थापन कोटा अंतर्गत रिक्त जागा प्रत्यार्पित करता येतील.<br>6) **नवीन विद्यार्थी नोंदणी व प्रवेश अर्जाचा भाग-1 भरणे सुरु होईल. (पुढील प्रवेश फेरीसाठी).**<br>**दक्षता: -**<br>• **पहिला पसंतीक्रम** मिळाला असल्यास विद्यार्थ्यांनि निवडलेल्या उमा विद्यालयात प्रवेश घेणे बंधनकारक आहे.<br>• जर प्रथम पसंतीक्रम मिळूनही प्रवेश घेतला नाही अथवा नाकारला तर अशा विद्यार्थ्यांना पुढील नियमित फेऱ्यांमध्ये संधी दिली जाणार नाही. त्यांना केवळ विशेष फेरी मध्ये संधी मिळू शकेल.<br>• जर विद्यार्थ्यास घेतलेला प्रवेश रद्द करावयाचा असल्यास तशी विनंती संबंधित उच्च माध्यमिक विद्यालयास करावी आणि आपला प्रवेश रद्द करुन घ्यावा.<br>• घेतलेला **प्रवेश रद्द केलेल्या विद्यार्थ्यांची नावे** पुढील नियमित फेऱ्यांसाठी प्रतिबंधित करण्यात येतील. अशा विद्यार्थ्यांना विशेष फेरीपर्यंत थांबावे लागेल. |
| 5 | **12-09-2020, 20:00 वा पर्यंत** | झालेले प्रवेश संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदविणेसाठी उच्च माध्यमिक विद्यालयांसाठी अतिरिक्त वेळ.<br>(17:00 वा पासून 20:00 वा पर्यंत) |
| 6 | **12-09-2020, 22:00 वाजता** | प्रवेशाची नियमित फेरी-3 साठी रिक्त जागांचा तपशील जाहीर करणे.<br>(यामध्ये रिक्त राहिलेल्या तसेच कोटयातून प्रत्यार्पित केलेल्या रिक्त जागांचाही समावेश असेल.) |

**सूचना-**

1. ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळालेला आहे अथवा त्यांनी आपला प्रवेश (केंद्रिय प्रवेश प्रक्रियेतून अथवा कोटा प्रवेशाद्वारे) निश्चित केलेला आहे, अशा विद्यार्थ्यांसाठी प्रवेशाची कार्यवाही पूर्ण होईल.
2. केंद्रिय प्रवेश प्रक्रिया व राखीव कोटांतर्गत प्रवेश दिलेल्या वेळापत्रकानुसार समांतरपणे सुरु राहतील.
3. यापूढील प्रवेश फेऱ्यांचे (नियमित फेरी-3, विशेष फेरी) वेळापत्रक नंतर जाहीर करण्यात येईल.

**पुणे, दि.03/09/2020**

**(दिनकर पाटील)**
शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)